

REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामयाः

# रेकि ब्रह्म

वर्ष १०वे अंक १ला
ऑक्टोबर २०२१

email: reikibramhamasik@gmail.com



# साधकाच्या आयुष्यातील समुद्रमंथन..

आज सकाळीच एका साधकाचा फोन आला. त्याला गुरूचरित्र वाचायची फार इच्छा होती. म्हणून त्याने कालच्याच गुरूवारी गुरूचरित्र वाचायला काढले. मुळात ही मंडळी जैन धर्मीय. त्यामुळे त्याच्या आईवडीलांचा इतर कोठल्याही धर्माच्या गोष्टी करायला विरोध. साहजिकच त्याच्या आईने त्याला कडाडून विरोध केला आणि त्याला गुरूचरित्र वाचण्यास प्रतिबंध केला. त्यामुळे त्या साधकाला प्रचंड क्रोध आला व त्याचा परिणाम त्याला फीट येण्यात झाला. गेल्या आठवड्यात आणखी एका साधकाचा असाच फोन आला होता. त्याला रूद्राध्याय म्हणायची आणि ऐकायची फारच आवड. त्यामुळे तो माझ्या रूद्राची सीडी लावून ऐकायचा. परंतु घरामध्ये कोणालाच अध्यात्माविषयी आवड नाही. नव्हे तिटकाराच आहे. त्या साधकाला रूद्र ऐकण्यास मनाई झाली. मग तो आता आपणच कानात फोन लावून ऐकतो. आता हे बऱ्याच ठिकाणी दिसायला लागले आहे.

साधकाच्या साधनेमध्ये विघ्न होणे हे नित्याचेच आहे. परंतु आता ते बऱ्यापैकी घरच्याच किंवा जवळच्याच माणसांपासून व्हायला लागलेले आहे. प्रत्येकाचाच जणू एक अर्जुन होतोय. आपलेच म्हटल्यानंतर झगडणे किंवा संघर्ष करणे कठीण असते. परंतु साधनेची गोडी ज्याला लागली त्याला ती सोडणे सुद्धा सहज नसते. ह्यालाच मी साधनेतील समुद्र–मंथन म्हणतो.

जगात समतोल साधण्यासाठी देवता आणि असुर या दोघांच्यातही समन्वय असावा अशा उद्देशाने भगवान विष्णुंनी समुद्र मंथनाची कल्पना सुचवली. आता हे मंथन जगात असते कि आपल्या अस्तित्वात हे आपण ठरवायचे. समुद्र म्हणजे आपले अफाट अस्तित्व. समुद्रासारखे विशाल, अथांग, अगदी त्यात उसळणाऱ्या लाटांसकट. त्या अस्तित्वाचे मंथन करायचे म्हणजे त्याला एक बैठक हवी. बैठक कोणती तर आपल्या जड अस्तित्वाची. म्हणून मग कासवाची निवड. कासव म्हणजे ९५% स्थूल आणि केवळ ५% सूक्ष्म अशी अवस्था. म्हणजे जवळ जवळ आपले स्थूल जीवन. त्याची बैठक आवश्यक कारण त्यावरच आपला मेरू (मेरूदंड?) उभा करायचा आणि आपल्याच कुंडलीनीच्या तक्षक सर्पाने घुसळायचे. आपल्यातीलच देव आणि दानव किंवा सकारात्मकता आणि नकारात्मकता हे घुसळणार. मग आपल्याचा सात चक्रांमधून बाहेर पडणारी चवदा रत्ने (म्हणजे प्रत्येक चक्राच्या द्वैतामधून बाहेर पडणारे दोन गुण–दोष) आणि अर्थातच बाहेर पडणाऱ्या संस्कारांचे विष, प्रत्यक्ष कालकूट. पण हे कालकूट पचवायला आपल्यातील शिवता (शुद्धता) जागृत असायला हवी नाहीतर आपल्या साधनेचाच बोजवारा उडायचा. हे विष पचवल्याशिवाय अमृतापर्यंत पोहोचता नाही येणार. अमृतातील अमरत्वाला प्राप्त व्हायचे असेल तर विषातील मृत्युच्या आव्हानाला झेलावेच लागणार. अशुद्धीला टाळून कोठलेच शुद्धीकरण शक्य नाही होत. आणि हाच साधकाच्या आयुष्यातील सगळ्यात मोठा संघर्ष.

अमृताकडे जायचा मार्गच मुळात विषाच्या बोगद्यामधूनच पार होत असतो. आज साधकाच्या घराघरामध्ये हा संघर्ष दिसून येईल आणि जसा जसा साधक आपल्या साधनेच्या प्रगतिच्या टप्प्यावर पोहोचेल तस तसा हा विरोध, हे विष आणखीनच कटू बनेल. पण साधकाने स्वामींवरची श्रद्धा ढळवायची नाही, आपल्या मार्गावरचा आपला विश्वास डगमगू द्यायचा नाही एवढे खरे. स्वत:तील शिवतत्वाला सातत्याने आवाहन करत जागृत ठेवायचा. डोक्यावरील चंद्राच्या शीतलतेला गमावयाचे नाही. आणि एकदा का ही अवस्था पार पडली कि मग ऐरावतावर बसून कल्पवृक्षाच्या छायेत विसावयाचे. उच्चैश्रवा घोड्यावर बसून फेरफटका मारायचा आणि शंखध्वनी करत जयघोष करायचा, परिजातकाच्या झाडाखाली फुले वेचायची, कामधेनूकडुन जगासाठी वर मागायचा, अप्सरेसारख्या थिरकणाऱ्या रेकिच्या सौंदर्य लहरींच्या सरींमध्ये न्हाऊन निघायचे. आणि हे करत करत आपल्यातील देव–दानवांचा समतोल राखत एक दिवस मोक्षाच्या अंगणात आपले घरटे बांधायचे हेच खरे.

**अजित सर**
२४ सप्टेंबर २०२१



# पार्थिव गणेश

अवधूत पोटफोडे, देवरूख.









## गणेश पूजेसाठी पार्थिव मूर्तीच का असावी?

सध्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात गणेश पूजेबद्दल अनेक समज–गैरसमज असलेले निदर्शनास येतात. काहींच्या मते भाद्रपद महिन्यात केले जाणाऱ्या गणेश पूजनासाठी मातीची गणेशमूर्ती असावी, पीओपी म्हणजे प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती असू नये असे म्हटले जाते. पण ते असेच का? याचं समाधानकारक उत्तर आपल्याला कुठेही सापडत नाही.

यासंदर्भात या लेखामध्ये आपण चर्चा करणार आहोत. मी स्वत: मातीच्या व पर्यावरणपूरक गणेशमूर्ती घडविणारा कलाकार असल्याने या समस्येकडे डोळसपणे बघणे मला गरजेचे वाटते, कारण समाजामध्ये या सगळ्या गोष्टींच्या संभ्रमामुळे सर्वसामान्य मनुष्य द्वैतभावनेतच गणेशोत्सव साजरा करतो. गणेश उत्सव यामुळे पर्यावरणाची हानी होते, पर्यावरणाचे प्रदूषण होते अशा अनेक गोष्टी ऐकायला येतात. परंतु प्रदूषणाची समस्या ही खरच गणेश मूर्तीच्या विसर्जनाने होते का? या प्रदूषणाच्या समस्येतून जर गणेशोत्सवाला सोडवायचे असेल तर ते काम सरकारचे नसून प्रत्येक गणेशभक्तांचे आहे.

तसे पाहीले तर प्रदूषणाची समस्या कायमस्वरूपी भेडसवणारी आहे. परंतु गणेशोत्सवात समाजाच्या तळागाळातून गणेश मूर्ती आणि त्यांचे निर्माल्य पाण्यात विसर्जित केले जाते. त्यामुळे एकाच वेळी प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण होते. यावर पर्याय काय? कारण या सगळ्या गोष्टी गणेशभक्तांच्या श्रध्देशी, भावनेशी जोडलेल्या असतात. परंतु या सगळ्या गोष्टी जर आपण डोळसपणे केल्या तर त्याचे फळ चांगलेच मिळू शकते व प्रदूषणातून पर्यावरणाला आपण वाचवू शकतो. यावर एकच उपाय म्हणजे गणेश पूजेसाठी पार्थिव गणेश मूर्तीची स्थापना करणे.

आता आपण मुख्य मुद्यावर म्हणजेच 'पार्थिव गणेश' या विषयाबद्दल जाणून घेऊ. पार्थिव हा शब्दच मुळात 'पृथा' या शब्दातून निर्माण झाला आहे. पृथा म्हणजेच माती आणि माती म्हणजेच पृथ्वी तत्व. म्हणजेच शास्त्रात सांगितल्याप्रमाणे पार्थिव गणेश मूर्ती पृथ्वीतत्वाने बनवलेली असावी. पण गंमत अशी आहे की पृथ्वी तत्वामध्ये फक्त मातीच येते का? तर नाही. पृथ्वीच्या गर्भातून ज्या ज्या गोष्टी मिळतात किंवा त्यातून ज्या गोष्टी जन्म घेतात त्या सर्व पृथ्वी तत्त्वाच्या असतात. उदा. माती, दगड, वाळू, धातू, लाकूड, पी.ओ.पी. म्हणजेच प्लास्टर ऑफ पॅरिस इत्यादी. मग या सर्वांची मूर्ती बनवायची का? हा प्रश्न उपस्थित होतो. परंतु त्याचे उत्तर आहे नाही. कारण पार्थिव गणेश मूर्ती बनवण्याचा मान हा आपल्या पूर्वजांनी मातीलाच बहाल केला आहे. म्हणून गणेश मूर्ती ही मातीचीच बनवण्याचा प्रघात सुरु झाला.

पण मग ती मातीचीच का? असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. शास्त्राप्रमाणे गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करणे गरजेचे असते. त्यानंतर त्या मूर्तीत प्राण आणून आपण तिची पूजा करू शकतो व फलश्रुती मध्ये इच्छित फल प्राप्त करू शकतो. त्याचबरोबर पूजेच्या मूर्तीचे विधिवत विसर्जन करणे गरजेचे असते. या ठिकाणी 'विधिवत' हा शब्दप्रयोग महत्वाचा वाटतो आणि याच ठिकाणी सर्व समस्यांचे मूळ आहे. गणेश मूर्तीचे विधीवत विसर्जन न झाल्याने प्रदुषणासारख्या भयंकर समस्येला आपण सामोरे जात आहोत.

## तर विधीवत म्हणजे नक्की कसे?

विधीवत म्हणजे पार्थिव गणेश मूर्ती पाण्यात, मूर्तीची विटंबना न होता विसर्जित करणे. भारतीय संस्कृती ही जशी सगुणाची उपासना करण्यास सांगते, तशीच ती निर्गुणाचे अस्तित्व आपल्यातच कसे आहे हे ही सांगते. ज्याप्रमाणे आपल्या सूक्ष्म शरीराचा विचार केल्यास हे लक्षात येईल की आपल्या सूक्ष्म शरीरावर २६ ऊर्जा ग्रहण करणारी शक्तिकेंद्रे आहेत. त्यात ७ चक्र महत्वाची मानली आहेत. या २६ ऊर्जा केंद्रावर व या ७ चक्रावर प्रत्येकी एका देवतेचे अधिष्ठान मानले गेले आहे. त्यापैकी सातव्या क्रमांकाचे जे चक्र आहे त्याला मूलाधार हे नाव आहे आणि हे चक्र पृथ्वी तत्वाचे प्रतिक आहे. या चक्रावर गणेश या देवतेचे अधिष्ठान आहे. याचा दाखला गणेश अथर्वशीर्षातही सापडतो. 'त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् ।' यावरूनही हे लक्षात येते की गणेश ही देवता पृथ्वी तत्त्वाशी निगडीत आहे, म्हणून तिचे पूजन करण्यासाठी पार्थिव मूर्ती वापरणे उचित ठरते.

आपल्या संस्कृतीमध्ये पार्थिव या शब्दाचा आणखीन एक अर्थ पाहायला मिळतो तो म्हणजे 'पंचतत्त्वापासून बनलेला परंतु प्राण नसलेला' म्हणूनच पार्थिव गणेश मूर्तीत प्राण आणून तिची प्राण प्रतिष्ठापना करून तिला जीवित करून पूजन केले जाते व नंतर पाण्यामध्ये विसर्जित केले जाते. तरीही पार्थिव मूर्ती पाण्यातच का विसर्जित करावी हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

त्याची अनेक कारणे आपल्याला आपल्या संस्कृतीतच सापडतात. आपल्या संस्कृतीमध्ये पार्थिव गोष्टीचे पंचतत्त्वात विलीन करण्याचे काही संस्कार आहेत. त्यामध्ये पार्थिव देह असेल तर तो अग्नीमध्ये किंवा जमिनीमध्ये दहन किंवा दफन केला जातो व पुढचे संस्कार हे पाण्याच्या माध्यमातूनच केले जातात. त्याचप्रमाणे पार्थिव गणेश मूर्ती पंचतत्त्वात काही तासात विलीन होणे गरजेचे आहे. पार्थिव मूर्ती मातीची असल्याने पाण्याच्या माध्यमातून काही अवधीतच ती पंचतत्त्वात विलीन होते. म्हणजे काय या असीम अंनत परमेश्वराचे सगुण रुप निर्गुणात रुपांतरीत होते. हा सगुणाचा निर्गुणापर्यंतचा प्रवास विधीवत होणे आवश्यक असते. म्हणून गणेशमूर्ती ही पार्थिव असणे आवश्यक आहे.

सध्या या गोष्टीला आणखी एक पर्याय उपलब्ध झालेला आपल्याला दिसतो तो म्हणजे पर्यावरणपूर्वक गणेशमूर्ती. या मूर्तींनाही पार्थिव गणेश मूर्ती असेच म्हणतात. कारण त्याच्यामध्ये असलेला कागद हा पृथ्वी तत्त्वाचे प्रतीक मानला गेला आहे आणि त्याचे काही अवधीतच विसर्जन होते. त्यामुळे गणेश भक्तांनी पार्थिव गणेश मूर्ती म्हणून माती किंवा पर्यावरणपूरक गणेशमूर्तीचा आग्रह धरणे श्रेयस्कर आहे. हे झाले शास्त्रोक्त गणेश मूर्तीचे पूजन आणि विसर्जन.

आता आपण पाहू आपल्या कोणत्या चूकीमुळे जलप्रदूषण होते. तसे पाहता प्रत्येक गोष्ट ही निसर्गातूनच जन्म घेते आणि निसर्गातच तिचा अंत होतो. परंतु गणेश पूजनामध्ये जसा प्राणप्रतिष्ठापलेना महत्व आहे तसेच विसर्जनालाही अनन्यसाधारण महत्व आहे. पार्थिव किंवा पर्यावरण पूरक गणेश मूर्तीच्या विसर्जनातून प्रदूषण कधीही होत नाही. प्रदूषण हे मूर्तीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या रासायनिक रंग, कृत्रिम हिरे, मोती, धातू, प्लास्टिक, पूजेचे निर्माल्य, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती यांच्या माध्यमातून होते. ते कसे होते ते आपण पाहू. उपरोक्त सांगितलेल्या गोष्टी या ज्यावेळी जलप्रवाहात सोडल्या जातात त्यावेळी या गोष्टींचा पाण्यामध्ये राहण्याचा कालावधी काही महीने, काही वर्ष एवढा मोठा असतो. या प्रक्रियेतून प्रदूषण होताना दिसते. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीचे लगेच विघटन होत नाही त्यामुळे त्या मूर्तीची विसर्जनाऐवजी विटंबनाच जास्त होते. "पी.ओ.पी ची मूर्ती स्वस्त किमतीत मोठी मिळते म्हणून ती घायची" हे उचित नव्हे. सर्व गोष्टींचा विचार केला तर गणेशोत्सवासाठी मातीची किंवा पर्यावरण पूरक गणेश मूर्ती वापरणे हे उचित ठरते हे लक्षात येते. आपल्या संस्कृतीमध्ये भाद्रपद महिन्यात होणाऱ्या गणेश मूर्तीच्या पूजनासाठी बनवल्या जाणाऱ्या गणेश मूर्ती या मातीच्या किंवा पर्यावरणपूरक असाव्यात असा संकेत दिला गेला आहे.

तर मग प्रत्येक गणेश भक्ताने, आपल्या बाप्पाची विटंबना होणार नाही आणि त्याचे जे निसर्गरुपी असीम अनंत विराट रुप आहे याचाही ऱ्हास आपल्याकडून होणार नाही, असा संकल्प करूया.



# अष्टावक्र गीता

(भाग १२) अध्याय ४था

अजित सर

## सूत्र ४.१

**हन्तात्मज्ञस्य धीरस्य खेलतो भोगलीलया ।**
**न हि संसारवाहीकैर्मूढैः सह समानतः ॥ ४.१ ॥**

**अर्थः** (राजा जनक अष्टावक्रांनी तिसऱ्या अध्यायात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ह्या अध्यायात देत आहेत. हे करून त्यांना आपल्याच आत्मज्ञानाची पुष्टी अनुभवता येत आहे) जनक म्हणतात, "अहो! भोगविलासाशी खेळणाऱ्या आत्मज्ञानी पुरूषाची तुलना संसाराचे ओझे डोक्यावरून वाहणाऱ्या मूढ पुरूषशी कशी होऊ शकते?

जनकाने केवळ सहा सूत्रांमध्येच ह्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देऊन टाकली आहेत. अज्ञानी अहंकाराने भरलेला असतो आणि त्यामुळे त्याच्या प्रत्येक कृतीमध्ये केवळ अहंकारच प्रतित होत असतो. ह्या अहंकारामुळेच प्रत्येक कर्माचे कर्तापण तो अनुभवत असतो. ह्या कर्तेपणामुळेच फळाची आसक्ती येते. ज्ञानी पुरूष जाणत असतो कि आपण आपल्या कर्मांचे कर्ता नाही आणि त्यामुळेच फळावरती आपला काहीच अधिकार नाही. निव्वळ अपेक्षाही नाही. आणि जेथे अपेक्षा नाही तेथे अपेक्षाभंगही नाही. अर्थातच येथे नैराश्याला स्थानच नाही. अज्ञानी सगळी कर्मेच अहंभाव आणि वासनांतून करत असतो त्यामुळे वासनापूर्ति न झाल्याने तो वारंवार दु:खी होत असतो, आत्मज्ञानी संसाराचा उपभोग घेत नाही असे नाही परंतु तो ते कर्ताभावाने न करता केवळ साक्षीभावाने करत असतो. परमेश्वराने दिलेल्या गोष्टी भोगणे पाप नाही उलट त्याचा तिरस्कार करणे हे पाप ठरू शकते. कोठल्याही गोष्टीची अभिलाषा न धरता एखादी गोष्ट स्वाभाविकपणे समोर आली तर त्याचा स्विकार व्हायला हवा. परंतु एखाद्या गोष्टीच्या प्राप्तिचा ध्यास लागणे आणि ती गोष्ट न मिळता दु:खी होणे हे सामान्य माणसाच्या बाबतीत घडते, परंतु आत्मज्ञानी अशा गोष्टींना बळी पडत नाही. ज्ञानी माणसाला हा संसार एक आभास असल्याने तो त्यात फारसा गुंतून पडत नाही. ज्ञानी कर्माला खेळ मानतो तर अज्ञानी खेळाला कर्म.

## सूत्र ४.२

**यत्पदं प्रेप्सवो दीना शक्राद्याः सर्वदेवताः ।**
**अहो तत्र स्थितो योगी न हर्षमुपच्छति ॥ ४.२ ॥**

**अर्थः** ज्या पदाची इच्छा दीनवाणे पणाने प्रत्यक्ष इंद्रासारख्या देवता करत असतात ते पद प्राप्त होऊनही योगी पुरूषाला त्याचा आनंद होत नाही हे आश्चर्य आहे.

ज्ञानी आणि अज्ञानी, दोघेही कर्म करतात. परंतु अज्ञानी त्या कर्माच्या फळांची अपेक्षा करतो तर ज्ञानी या अपेक्षांपासून दूर राहतो आणि त्यामुळे अपेक्षाभंगाच्या दु:खातूनही अलिप्त राहतो. येथे जनक म्हणतात कि प्रत्यक्ष इंद्रासारख्या देवताही आपले पद जाईल या भीतिने त्या पदाची प्राप्ति होऊनही दु:खीच राहतात. योगी पुरूष मात्र आपले काहीच नाही असे मानल्याने त्याला त्या पदाचा आनंद नसतो ना ते पद गमावण्याची क्षिति. हे पदाचे असणे किंवा नसणे, कमावणे किंवा गमावणे या साऱ्या गोष्टी द्वैतातील आहे. त्यामुळे अद्वैतात विहार करणारा योगी पुरूष त्याची कधीच पर्वा करत नाही. द्वंद्वातीत अवस्था हीच मुक्ती आहे. द्वंद्व हेच पाश आहेत. ते पाश एकदा का तुटले कि आपण त्या आत्माकाशात विहरायला मोकळे.

## सूत्र ४.३

# तज्ज्ञस्य पुण्यपापाभ्यां स्पर्शो ह्यन्तर्न जायते ।
# न ह्याकाशस्य धूमेन दृश्यमानापि संगतिः ॥ ४.३ ॥

**अर्थः** जसे आकाशाला धूराचा त्रास होत नाही, ते धूराने प्रदूषित होत नाही तसेच त्या पदाला पोहोचलेल्याच्या अंत:करणाला पाप व पुण्याचा स्पर्शच होत नसतो.

जेव्हा माणसाचे अंत:करण शरीराशी, मनाशी, बुद्धीशी किंवा इतर इंद्रीयांशी जोडलेले असते त्यावेळेला ते पाप-पुण्याचा अनुभव करत असते. परंतु ज्या क्षणाला शुद्ध होऊन आपल्या आत्मतत्वाशी जोडले जाते त्यावेळेला ते विकार-रहीत होऊन पाप-पुण्याच्या भागिदारीतून मुक्त होते. पाप-पुण्य ह्या केवळ भावना आहेत. ती काही कृत्य नव्हेत. परंतु भावनांना अहंकाराचा स्पर्श झाला का ह्या पाप-पुण्यांच्या धारणा सुरू होतात. एकदा का चित्त शुद्ध झाले कि मग पाप आणि पुण्य कधीच अंत:करणाला स्पर्शू शकत नाहीत. पृथ्वीवरून आकाशाकडे जाणारा धूर पाहून अपल्याला वाटते कि हा धूर आकाशाला व्यापून उरला आहे आणि सगळे आकाशच धूराने भरून गेले आहे. हा तर निव्वळ भास आहे. आकाशाला त्या धूराचे सोयर सुतकही नसते.

ज्ञानी कसा असतो अथवा असावा ह्याची लक्षणे अज्ञानी ठरवत असल्यामुळे हा विचारांचा गोंधळ होत आहे. आपल्या मूर्खपणाने हे अज्ञानी म्हणतात कि ज्ञानी हा उघडा-नागडा फिरणारा असावा, त्याने खाणे-पिणे सोडलेले असावे, जो सदाच उदास दिसावा, जो कृशकाय झाला आहे, ज्याच्या डोळ्यात उदासिनता असावी, एखाद्या प्रेतासारखे त्याचे अस्तित्व असावे इत्यादि. जसे आज औषधांचे व्यापारी रोगांची लक्षणे ठरवतात तसेच काहीसे. जनक अश्या व्याख्या आणि लक्षणे नाही सांगत. ते स्पष्टपणे जे आहे तेच येथे सांगत आहेत.

## सूत्र ४.४

# आत्मैवेदं जगत्सर्वं ज्ञातं येन महात्मना ।
# यदृच्छया वर्त्तमानं तं निषेध्दु क्षमेत कः ॥ ४.४ ॥

**अर्थः** ज्या महात्म्याने या साऱ्या विश्वाला आपल्या आत्म्यासारखे जाणले आहे त्या ज्ञानसिद्धाला आपल्या इच्छेप्रमाणे व्यवहार करण्याला कोण रोखू शकेल?

जो आपल्या आत्म्याला भिन्न मानून अहंकारातून सारी कर्मे करतो तीच कर्मे त्याला पाप आणि पुण्य फलप्रद करत असतात. परंतु जो आपल्या आत्मतत्वात स्थिर झाला आहे आणि जो सगळ्या जगाला आत्मभावानेच जाणतोय त्याची सारी कर्मे त्याची नव्हेतच कारण त्याचे कर्म करणारे अस्तित्वच आत्मतत्वात विलीन झालेले आहे. मग त्याला फळे कुठली आणि त्याला पाप आणि पुण्ये तरी कोठली? पाप आणि पुण्ये ही तर केवळ जगाने मानलेली फळेच आहेत. त्या महात्म्याची सगळी कर्मेच लीला स्वरूपात आहेत कारण ती आत्म्याने केलेली आहेत. त्यात अहंकार, मन, बुद्धी यांचा अंतर्भावच नाही. पाप-पुण्य ही द्वैताची भाषा आहे. अद्वैतात ही भाषा कोठून येणार?

## सूत्र ४.५

**आब्रह्मस्तम्बपर्यन्ते भूतग्रामे चतुर्विधे ।**
**विज्ञस्यैव हि सामर्थ्यमिच्छाऽनिच्छाविवर्जने ॥४.५॥**

**अर्थः** आत्म्याचे अलौकिक आणि ईश्वर स्वरूप जाणणारे फारच दुर्मिळ असतात. ते जे करू इच्छितात तेच करतात. त्यांना कोणाचीच किंवा कशाचीच भीति नसते.

आत्मसाक्षात्कारी नेहमीच उत्स्फूर्तपणे काम करत असतात. त्यांच्या वरील प्रारब्धाचा प्रभाव पूर्ण नष्ट झाल्यामुळे त्यांना परिणामाची क्षिती नसते, कर्ताभावच नष्ट झाल्यामुळे पाप–पुण्य, चांगले–वाईट, सुख–दु:ख ह्याच्या पलिकडे जाऊन ते त्यांचे कार्य करत असतात. आजकाल आपण पाहतो कि संन्यास–वेषधारी खूप आहेत पण त्यातील कोणीच खऱ्या अर्थाने संन्यासी नाही. अजूनही ते संसार आणि मायेतून मुक्त झालेले नाहीत. त्यांना काहीतरी मिळवण्याची आस आहे आणि जे आहे ते गमावण्याची भीति आहे. खरा महात्मा कर्ताभावच सोडून बसल्यामुळे त्याला ना आस ना त्याला भीति. ह्या सूत्राच्या वाचनाने डोळ्यांपुढे मूर्ति येते ती केवळ श्री स्वामी समर्थांची. आणि मग डोळ्यांसमोर उभ्या राहतात त्या त्यांच्या अफाट लीला.

## सूत्र ४.६

**आत्मानमद्वयं कश्चिंज्जानाति जगदीश्वरम् ।**
**यद्वेत्ति तस्य कुरुते न भयं तस्य कुत्रचित् ॥४.६॥**

**अर्थः** ज्या महात्म्याने या साऱ्या विश्वाला आपल्या आत्म्यासारखे जाणले आहे त्या ज्ञानसिद्धाला आपल्या इच्छेप्रमाणे व्यवहार करण्याला कोण रोखू शकेल?

जो आपल्या आत्म्याला भिन्न मानून अहंकारातून सारी कर्मे करतो तीच कर्मे त्याला पाप आणि पुण्य फलप्रद करत असतात. परंतु जो आपल्या आत्मतत्वात स्थिर झाला आहे आणि जो सगळ्या जगाला आत्मभावानेच जाणतोय त्याची सारी कर्मे त्याची नव्हेतच कारण त्याचे कर्म करणारे अस्तित्वच आत्मतत्वात विलीन झालेले आहे. मग त्याला फळे कुठली आणि त्याला पाप आणि पुण्ये तरी कोठली? पाप आणि पुण्ये ही तर केवळ जगाने मानलेली फळेच आहेत. त्या महात्म्याची सगळी कर्मेच लीला स्वरूपात आहेत कारण ती आत्म्याने केलेली आहेत. त्यात अहंकार, मन, बुद्धी यांचा अंतर्भावच नाही. पाप–पुण्य ही द्वैताची भाषा आहे. अद्वैतात ही भाषा कोठून येणार?



# आजीची गोधडी

सौ आरति जोशी,
बंगळुरू



एप्रिल महिना आला की अजूनही मन शाळकरी वयात नकळत फिरायला जाते. आजोळी जाण्याच्या ओढीने खरडलेला शेवटचा पेपर आजही आठवला की हसायला येते. परिक्षा संपताच रिझल्टची वाट न बघता दुसऱ्या दिवशी सगळ्यात पहिली सुपर एसटी पकडून आमची भावंडांची सेना आजोळी दाखल व्हायची. स्टॅंड ते घर जेमतेम १० मिनिटाचा रस्ता, त्यातही वाटेत ८ ते १० जणांनी आमचे 'आली का मंडळी' म्हणून तोंडभरून स्वागत केलेले असायचे.

अंगणात प्रवेश करताच शेणाने सारवलेल्या जमिनीवर रेखीव रांगोळी सुस्वागतम करायची, दाराच्या कमानीवरचा जुईचा वेल डोलावत 'या–या' म्हणायचा. कडी उघडल्यावर आवाज येताच घरातून आजोबांचा आवाज यायचा "अग ए आले बघ लाडकेश्वर". आवाजा पाठोपाठ हातात पाण्याचा तांब्या घेऊन माझी वामन मूर्ती आजी आमच्या स्वागताला बाहेर यायची. सगळ्यांच्या पायावर पाणी घालून तोंडभरून हसत जवळ घ्यायची. आमच्या बरोबर आई, मावशी ह्या माहेरवाशणी असायच्या. घरात गेल्या गेल्या आडावर जाऊन हातपाय स्वच्छ धुवायचे, देवाला मग आजी आजोबांना नमस्कार करायचा, हातावर ठेवलेला गुळाचा खडा आणि पाणी गटटम करायचे हा मनावर बिंबलेला संस्कार होता. हे सर्व चालू असताना मन मात्र स्वयंपाकघरात पोहोचलेले असायचे कारण साबुदाणा खिचडी, पोहे, किंवा उप्पीट याचा भूक चाळवणारा दरवळ घरभर पसरलेला असायचा.

प्रवासातील कपडे बदलून आम्ही भांवडे स्वयंपाकघरात दाखल व्हायच्या आधीच स्टीलच्या प्लेटांमध्ये गरम गरम नाष्टा त्यावर सुक्या खोबऱ्याचा कीस, गरम गरम दूध वाट बघत असायचे, घास तोंडात घालताच माझ्या एका भावाचा प्रश्न, "आजी तुम्ही डायनींग टेबल का ग नाही घेत?" त्यावर समस्त भावंडांच्या प्रतिक्रिया आजी कौतुकाने ऐकत शेवटी म्हणायची, "सोन्या, खाली पाटावर बसून जेवलास की लक्ष फक्त खाण्यावरच राहतं आणी अन्न पचन उत्तम होतं."

मग माझा प्रश्न, "आजी घरी आल्या आल्या गूळ देऊन मगच पाणी का प्यायला देतेस?" "कावेरी, अग उन्हातून आल्या आल्या घटाघटा पाणी प्यायलं की बाधतं. आधी गूळाचा खडा तोंडात टाकला की थकवा दूर होतो. गुळात की नाही बाळा खूप खनिजं असतात, बघ तुम्ही कसे सगळे उत्साहाने गप्पा मारताय."

"आजी, आम्ही आल्यावर पाणी का घालतेस आमच्या पायावर? माझे पाय तर स्वच्छच असतात." छोटया जुईचा प्रश्न. "अरे आल्या आल्या किती भंडावताय तिला" मावशीची लटकेच दटावणी. "अग शैला, असू दे ग. आवडते मला. जुईबाळा बाहेरच्या दुष्ट शक्ती पायावाटे आपल्या शरीरात प्रवेश करतात आणि ठाण मांडून बसतात. आपल्याला वाईट विचार करायला लावतात. मग सांग त्यांनी आपले बस्तान बसवायच्या आत त्यांना बाहेर हकलून लावायला नको?"

आजी अशा अफलातून गोष्टी इतक्या सहज सांगायची की मन थक्क व्हायचे. बरं, पुस्तकी ज्ञान म्हटले तर फक्त ७ वी पास. मला तिच्या अवतीभवती रहायला खूप आवडायचे.

सकाळचे नाष्टा पाणी झाले की आम्ही मुले खेळायला धूम ठोकायचो. उन्हे वर आली असली की बैठे खेळ. मग ओसरीवर सापशिडी, व्यापार, सागरगोटे, पत्ते, काचा पाणी यांचे फड बसायचे. साधारण १ च्या सुमारास जेवणासाठी हाक यायची. जेवायला बसायला पाट आणि ताट ठेवायला पाट, पंक्तीच्या कडेला छोटी रांगोळीची बेलबुटटी. प्रसन्न वातावरण !

ताट, उजवी डावी बाजू सांभाळत वाढलेले. वाढलेले सगळे संपवायचे हा कटाक्ष. जेवणात कधी कधी गोड असायचे, गोड म्हणाजे साखरंबा, शिरा, खीर, सुधारस असे पदार्थ. जेवायची सुरुवात माझे आजोबा आणि मुंज झालेले भाऊ चित्रावती घालून करायचे. ताटाभोवती फिरणारे किडा मुंगी हे खाऊन तृप्त व्हावेत, हा त्यामागचा उद्देश. 'वदनी कवळं' म्हणत हसत खेळत जेवण व्हायचे. जेवायची सुरुवात कायम तिखट पदार्थाने

करायची कारण हे पदार्थ प्रथम खाल्ल्याने लाळ पाझरते, जाठररस पाझरतो आणि अन्न पचन चांगले होते. जेवणानंतर परत एक गुळाचा खडा हातावत कारण गूळ पोट, फुफुस साफ ठेवायला मदत करतो. आजी–आजोबांनी अशा अत्यंत साध्या गोष्टी त्यांच्या दैनंदिनीचा भाग बनविल्या होत्या. मी त्या दोघांना कधीही आजारी पडलेले पाहिले नाही की औषधांच्या गोळ्या घेताना पाहीले नाही.

दिवसभर बैठे खेळ खेळल्यावर उन्हे उतरली की बाहेर अंगणात आम्ही खेळ खेळायला जात असू. त्यात जोडसाखळी, विषामृत, दगड का माती, डबा ऐसपैस असे बिनसामुग्रीचे खेळ. खेळ खेळून झाले की ७ च्या आत घरात. हातपाय तोंड स्वच्छ धुवून आमचा चमू देवघराच्या समोर परवचा म्हणायला बसायचा. देवघरात अहोरात्र नंदादिप तेवत असायचा पणा संध्याकाळी आजी साजूक तुपाचे निरंजन लावायची. "एक दिवा असताना हा दुसरा का लावतेस ग आजी?" माझा प्रश्न.

"कावेरी तुपाचा दिवा स्वत:च्या बाजूला तेजाचे वलय निर्माण करतो. आपले मन शांत करतो. आपल्याला अंर्तमुख बनवतो. अंर्तमुख म्हणजे काय कळले?" मी प्रश्नार्थक मान डोलावली. "म्हणजे एकाग्र चित्ताने फक्त स्वत:च्या मनात डोकावणे." त्या वयात हा अर्थ फारसा कळायचा नाही पण हात आपोआप जोडले जायचे आणि त्या तेजस्वी शांत ज्योतीकडे बघून शुभंकरोती म्हटले जायचे. त्यानंतर मनाची एकाग्रता वाढवणारे अनुष्टुप छंदातले रामरक्षा स्तोत्र.

ह्या सगळ्याचा आमच्या मनावर खूप खोलवर नकळत संस्कार होत होता. रात्रीची जेवणे आटोपून कंदिलाच्या मंद प्रकाशात आजीच्या गोधडीच्या ऊबेत, गोष्टी ऐकत कधी झोप लागायची कळायचेच नाही. सकाळी उठून स्वैपाकघरात दूध प्यायला आम्ही भावंडे ओळीने बसायचो. आजी वैल चुलीवरचे दुधाचे पितळी पातेले फडक्याने खाली उतरवायची, त्यावरची खरपूस साय चमच्याने अलगद बाजूला करायची आणि आमचे कप भरायची. मी तिला कधीही फुंकरीने साय बाजूला केलेली पाहिली नाही. एकदा मी तिला ह्याचे कारण विचारले, तर म्हणाली अगं फुंकरीने दुध उष्टे होते. आपण कधीही उष्टे देऊ नये आणि खाऊ नये.

अशा सगळ्या प्रेमाने भरलेल्या न बोचणाऱ्या शिस्तित आमचा एक महिना भुर्रकन उडून जायचा आणि परत पुण्याला जाण्याची वेळ यायची.

निघायच्या दिवशी सकाळी कासारीण आजी माहेरवाशिणींना बांगडया भरायला यायच्या. आई, मावशी, आजी उत्साहाने बांगडया भरून घ्यायच्या. मी आणि माझ्या बहिणी कुरकुरायचो. सोडून दिले तर आजी कुठली. तिची पोतडी कायम युक्त्यांनी भरलेली असयची. "कावेरी, तुम्हाला उत्साही रहायला आवडते का आळशी?" "आजी.. उत्साही.. असे का विचारतेस?" रेवतीचा सूर.. "हो ना.. अग ह्या बांगडया आपल्या मनगटावर घासल्या जातात त्यामुळे आपल्या शरीरात रक्तप्रवाह सुरळीत रहातो आणि आपले आरोग्य उत्तम ठेवतो. आरोग्य उत्तम असेल तर आपोआपच उत्साह येतो. आईच्या बांगडयांच्या आवाजाची किणकिण पोटात असल्यापासून बाळ ऐकते आणि बाहेर आल्यावरही आपल्या आईला ओळखते. दुसरी गोष्ट फक्त लक्षात ठेवा कारण अजून तुम्ही लहान आहात. बांगडयांचा नाजुक नाद घरातून कामासाठी बाहेर पडलेल्या पुरूषाला घराची ओढ लावतो."

बांगडया भरणे समारंभ झाला की आम्हा सर्वांना सतरंजीवर बसवले जायचे. प्रत्येकाच्या कपाळावर कुंकू लावून खाऊला पैसे आणि सुंदर कपडे दिले जायचे. "आजोबा, मला का बायकांसारखे कुंकू लावता?" सम्याचा तक्रारीचा सूर..

"तुला कुंकू लावतो ते बुध्दीपूजेचे प्रतिक म्हणून. प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाक हे कपाळावरचे कुंकू सांगते." आजोबांची कारणमिमांसा.

मग माहेरवाशिणीचा ओटी भरण्याचा कार्यक्रम. ओटीत तांदूळ, हळकुंड, फळं, नारळ असायचे. "आजी आमची का नाही अशी ओटी भरत" तेजूचा प्रश्न.. एकच हशा..

"तेजू, अग ओटी ही लग्न झालेल्या बायकांची भरतात. तिला लावलेले कुंकू हे दुष्ट शक्तींना रोखणारे आहे. ओटीत घातलेले तांदूळ हे विघ्न निवारक आहेत. हळकुंड, फळं ही भरभराटीचा, सुखसमृध्दीचा आशिर्वाद देतात.

आजीचे बोलणे फक्त ऐकत रहावेसे वाटायचे. कुठून घेतले असेल हे सारे ज्ञान तिने? ह्या नंतर सर्वात नको वाटणारा क्षणा.. टाटा करून निघण्याचा. प्रत्येकाच्या हातावर दह्याची कवडी ठेवताना आजी आजोबांचे डोळे पाणावायचे. त्यावेळेचे आजीचे शब्द आजही जसेच्या तसे आठवतात.. "बाळांनो. दही हे स्नेहाचे प्रतिक आहे. जरी तुम्ही आमच्यापासून लांब रहात असला तरी तुमचे आमच्यावरचे प्रेम ह्या दह्यासारखे दाट राहू दे. दह्यात दुसऱ्याला बदलायची शक्ती असते. दुधात मिसळले की ते दुधाला आपल्यासारखे बनवते. तुम्ही सर्वांनी दह्यासारखे झाले पाहीजे. सर्वांमध्ये मिसळायचे पण स्वत:चे अस्तित्व, संस्कार कायम जपून ठेवायचे."

दही तोंडात टाकत डबडबत्या डोळ्यांनी आजी आजोबांना घट्ट मिठी मारत आमचा पुण्याचा प्रवास सुरु व्हायचा. आजोळी जाताना चिवचिवणारे आम्ही परत जाताना मात्र खिडकीबाहेर बघत असायचो. प्रत्येकानेच एका महिन्यात खूप काही शिकलेले असायचे. बहुतेक प्रत्येकाच्या मनात आपापल्या परीने त्याची उजळणी चालू असायची.



# ज्ञानेश्वर
## एक रंगकर्मी

**श्री देवदत्त जोशी, पुणे**

'ज्ञानेश्वर– एक रंगकमी' हे पुस्तकाचे नाव वाचून मी विकत घेतले. पं. श्यामराव कुलकर्णी (रांगोळीकर) यांनी पुस्तकाचे लिखाण केले आहे. श्यामरावांचे वय ८५ वर्षाचे आहे. जवळ जवळ ७० वर्षे ते ज्ञानेश्वरी वाचत आहेत. भारतीय आवाज साधना शास्त्र, एक दिपस्तंभ, ग्वाल्हेर घराणं अशी एकाहून एक सरस पुस्तके त्यांनी लिहीली आहेत. अर्थात गायन या विषयावरची. ते स्वत: उत्कृष्ट गायक आहेत, संगीत शिक्षक आहेत. भगवान रजनीष यांचे प्रवचनापूर्वी ४८ रागात ४८ भजने गाऊन त्यांनी रजनीश यांची वाहवा मिळवली आहे. अमेरिकेत १४ वर्षे शास्त्रीय संगीत शिकवले आहे. श्यामराव म्युझिक अॅकेडमी जगमान्य झाली आहे. आजही पुण्यातून ते अमेरिकेन शिष्यांना रोज शास्त्रीय संगीताचे धडे देत आहेत. त्यांनी माऊंटआबू येथे श्री रजनीश यांच्या चित्तथरारक व अद्भूत ध्यान शिबिरात संन्यास दिक्षा घेतली. इथेच ध्यान योगिनी विमला ठकार यांच्याकडून दर्शनाग्रह आणि ज्ञानेश्वरीचे मार्गदर्शन घेतले.

अशा अनुभव संपन्न लेखकाने ज्ञानेश्वरीचा सिनेमॅटिक फॉर्म शोधला आणि संत ज्ञानेश्वरांचे गीतेचे अंतरंग आकर्षक स्वरूपात नाटयरुपात मांडले. ज्ञानेश्वरी म्हणजे आनंदाच आवार ही नवी दृष्टी दिली. संत ज्ञानेश्वरांना त्यांना जाणून घेणारा श्रोता हवा होता तो श्यामरावांच्या रुपाने मिळाला. श्यामरावांनी या पुस्तकाचे लिखाण १९९५ साली केले होते व पुर्नलेखन २००५ व २०२१ यासाली २ वेळा केले व या तपश्चर्येनंतर पुस्तक प्रकाशित केले.

**आता आपण पुस्तकाकडे वळुया.**

गीतेचा प्रारंभ जरासा धसकन झाला आहे, 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' असा आणि गाडी सुसाट वेगाने सुटते. ज्ञानेश्वर मात्र तस न करता एखाद्या मुरब्बी गवयाप्रमाणे, प्रारंभी मंद स्वरात थोडसं नोमतोम करतात. त्याला ते 'मंगलाचरण' असं सुंदर नाव देतात. ॐ नमोजी आद्या अशी सुरुवात करतात आणि ॐ या षडजानंच सारे श्रोते नि:स्तब्ध होतात व ऐकत राहतात.

ज्ञानेश्वरांनी एखादी मैफील रंगवावी अशा थाटात ज्ञानेश्वरी सांगितली आहे. गीतेपेक्षाही गोडी आणि कलात्मता वाढली आहे. तिला परफॉर्मिंग आर्टच म्हणजे एकपात्री रंगतदार प्रयोगाच स्वरुप आल आहे.

ज्ञानेश्वरीकडे केवळ भक्तिभावानं आणि आदरानं बघणं पुरेसं नाही. केवळ 'थीमच्या' म्हणजे विषयाच्या दृष्टीने (किंवा आशयाच्या पण) बघण हेही पुरेसं नाही, तर ज्ञानेश्वरीकडे 'ट्रिटमेंटच्या' म्हणजे अभिव्यक्ति – शैलीच्या अथवा घाटाच्या दृष्टीने बघण आवश्यक आहे आणि या दृष्टीने श्यामराव बघायला लागल्यावर त्यांना जाणवलं की ज्ञानेश्वर हे एक अभिजात रंगकर्मी आहेत आणि ज्ञानेश्वरी ही त्यांची नाटयसंहिता – स्क्रिट आहे.

ज्ञानेश्वरी बद्दल लोक बोलतात, तेव्हा त्यातील तत्वज्ञान वा काव्याबद्दल बोलतात पण ज्ञानेश्वरांचे वाकचातुर्य या दोन्ही पेक्षा निराळ आहे हे त्यांच्या लक्षातच येत नाही. लक्षात घेतल, तर येईल की ज्ञानेश्वरीचा 'घाट' इतर सर्व अध्यात्मकपर ग्रंथापेक्षा फारच वेगळा आहे. ज्ञानेश्वरीला ज्ञानेश्वरांनी चक्क नाटकाची ट्रिटमेंट दिली आहे.

नाटकामध्ये तत्वज्ञान आणि काव्य यापेक्षा 'कॅरेक्टरायझेशन' म्हणजे स्वभावचित्रण आणि त्या अंर्तगत भावभावनांच ह्रदयस्पर्शी दर्शन यांना महत्व असत. त्याचा संवादावर, डायलॉग डिलीव्हरीवर परिणाम होत असतो. कृष्ण, अर्जुन, संजय, धृतराष्ट्र, स्वत: ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ व श्रोते मंडळी ही सगळी आपआपल्या स्वभावानुसार बोलत असतात, त्यांच्या

कमी–अधिक मार्मिक व खोचक संवादानी ज्ञानेश्वरीची खुमारी जबरदस्त वाढली आहे. पण ज्ञानेश्वरांचे हे चातुर्य बुध्दीमंत व भक्तीमार्गी यांच्या पार डोक्यावरून गेले आहे, कारण ते ज्ञानेश्वरीच्या ट्रिटमेंट घाटाकडे बघतच नाहीत.

गंमत अशी होते की कृष्ण अर्जुनाशी बोलतो, संजय धृतराष्ट्राशी बोलतो आणि ज्ञानेश्वर कधी निवृत्तीनाथांशी तर बऱ्याच वेळा श्रोत्यांशी सारखे बोलतात. त्यांच्या या बोलण्याची उलटापालट वा सरमिसळ इतकी व इतके वेळा होते की त्या सगळ्या फ्लॅशबॅकची संगती लावता लावता संकलकाच्या तोंडाला फेस येतो, तो अर्धमेला होतो. ज्ञानेश्वरांनी ही पूर्णत: सिनेमॅटीक ट्रिटमेंट ज्ञानेश्वरीला दिली आहे. पण ही गोष्ट जावे त्यांच्या वंशा त्या कळे या सदरातील आहे. भारतात आणि अमेरिकेत सिनेमा कलेचा अभ्यास थोडाफार झाला असल्यामुळे श्यामरावांना हे कळले. ज्ञानेश्वरीचे चातुर्य दाखवण्याचा हा आगळावेगळा पर्यत्न.

कलाकार ज्ञानेश्वर ही संकल्पना निश्चितच अपुर्व आहे. मौलिक आहे. कलाकारांना रसिकांकडून साधी गोष्ट हवी असते आणि ती म्हणजे दाद ! रसिकांनी अंत:करणापासून दिलेली दिलखुलास दाद. कुणी पंडितांनी पंचनामा करावा वा श्रध्दाळू लोकांनी डोक्यावर घ्यावी अशी त्यांची अपेक्षा नसते, कलाकृतीचा आस्वाद घ्यावा ही अपेक्षा आणि निकष.

गीता सांगणारा ‘कृष्ण’ आणि त्याचा भावार्थ सांगणारे ‘ज्ञानेश्वर’ ह्या दोघांच्या भुमिकेत मुळातच फरक आहे, तोही मोठा. गीता सांगताना कृष्णावर जी बंधन नव्हती ती ज्ञानेश्वरांना पाळावी लागली आहेत. कृष्णानं गीता सांगितली ती एकटया अर्जुनाला आणि ती सुध्दा रणक्षेत्रावर ‘सेनयोरुभयोर्मध्ये’. ज्ञानेश्वरांनी एका ग्रामीण, समिश्र व आबालवृध्द अशा श्रोतृसमुदायाला सांगितली, ती ही नेवाशासारख्या खेडयात. त्याचा फार मोठा परिणाम निवेदनशैली वर झाला आहे.

कृष्णार्जुनाचा संवाद युध्दभूमीवर, त्याच वार्तांकन – रीपोर्टिंग केल संजयान धृतराष्ट्रासमोर हस्तिनापूरात, त्याची कथा बनवली ज्ञानेश्वरांनी नेवाशात. युध्दस्य कथा रम्या असा अक्षरश: अद्भूत चमत्कार घडला आहे. बुध्दीग्राह्य आणि रुक्ष अशा अध्यात्माची भावपूर्ण व रसाळ कथा ज्ञानेश्वरांनी केली आणि ती निश्चितच गहन आहे कारण ते आता अवधारा कथा एवढच म्हणत नाही तर आता अवधारा कथा ‘गहन’ म्हणत आहेत, ते ही टिच्चून म्हणत आहेत. जर ज्ञानेश्वर हे हाडाचे कलाकार नसते तर हा अजब चमत्कार ते करू शकले नसते. अध्यात्माच्या भिंतीवर बसले आणि त्याच्यात प्राण फुंकून ती भिंत चालवूनही दाखवली. केवळ महान कलाकारच हा चमत्कार करू शकतो. खरी गंमत ह्यापुढेच आहे कारण ही कथा पुढे कथाही न राहता दृष्यकथा होते, म्हणजे चक्क नाटकच होते. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी सुरुवातीलाच इशारा दिला आहे ‘आता अवधारा कथा गहन’!

# मेणबत्ती

**लेखा शेटये**

शिकावं कधी मेणबत्ती कडून
की जळणं काय असतं
दुसऱ्यांच्या सुखासाठी
स्वत: राख व्हायचं असतं

कधी तरी पहावं तिला
जळताना अंधारात
त्या अंधारालाही सामावून घ्यावं
इतक सामर्थ्य असतं तिच्यात

बसावं कधीतरी त्या मेणबत्ती समोर
फक्त पहायला तिला
आपलं जळत आयुष्य खूज वाटावं
असलं तेज लाभलयं तिला

स्तब्ध एका जागेवर
ती शांत उभी असते
जणू नि:शब्द डोळ्यातून
मेण अश्रू बनून वाहते

मेणा काया ज्योत आत्मा
त्या दोघांची सांगड आहे
अपूर्व ते एकमेकांशिवाय
ती पूर्ण अशी “मेणबत्ती” आहे.



# स्वामी विवेकानंद आणि ध्यान

**लेखांक १९वा**

**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**



## आज, आत्ता आणि इथेच..

काहीतरी चमत्कार घडेल म्हणून उगीचच वाट पाहू नका, त्याने काहीच व्हायचे नाही. आज, आत्ता, येथूनच सुरुवात करा. स्वर्गासाठी मृत्यूची वाट का पहावी? या इथे पृथ्वीवरच स्वर्ग बनवुयात.

मोझेसने देवाला पाहिले हे समजण्यासाठी आपंण देखील देवाला पहावयास नको का? जर तो सर्वशक्तीमान भगवान कोणाला दर्शन देणारच असेल, तर ते मग मला का मिळू नये? तो मलाही दर्शन देईल. मीही त्याला प्रत्यक्ष बघेन.

मला अंधश्रध्दा नको आहे, कारण त्या भोळ्या श्रध्देत अन नास्तिकतेमध्ये फारसा काहीच फरक नाही. म्हणून ते अधिकच निंदनीय ठरेल.

दोन हजार वर्षांपूर्वी अरेबियाच्या वाळवंटातील एका माणसाशी जर देव खरेच बोलला असेल, तर तो आज माझ्याशी देखील बोलू शकतो. अन्यथा मला त्याचे अस्तित्व कसे कळेल? कसे कळेल मला की तो आजही आहे. त्यामुळेच कोणतीही साधना जी मला त्याच्याकडे घेऊन जाते, ती सदोदित करीत रहा. अन तुमचे अंतिम ध्येय साध्य करा, पण असे करताना इतरांना मात्र खाली ढकलू नका.

## प्रचीन अंगाईगीत

अशी एक आख्यायिका आहे की एकेकाळी एक हिंदू राणी होती. तिची इच्छा होती की तिच्या सर्व मुलांना या जन्मीच मोक्ष मिळावा. म्हणून मग ती स्वत:च त्यांची जातीनं काळजी घेत असे. प्रत्येक गोष्टीत बारकाईने लक्ष घालीत असे.

मुलांना लहानपणी झोपविताना, ती रोज एक अंगाईगीत गायची. त्यात बोल होते 'तत्वमसि तत्वमसि' (म्हणजे तू आणि तो एकच आहेस.) चारपैकी तीन मुलं मोठेपणी संन्यासी झाली. परंतु चौथ्या मुलाला आईपासून दूर नेण्यात आले. तिकडेच तो लहानाचा मोठा झाला, अन एका राज्याचा राजा झाला. तो घरापासून दूर जात असताना आईने त्याला एक चिठठी दिली आणि सांगितले की मोठा झालास की ही चिठठी उघडून बघ. एक दिवस त्याला आईने दिलेल्या त्या चिठठीची आठवण झाली, अन त्याने कागद उलगडून ती चिठठी वाचली. त्यात आईने एक संदेश लिहीला होता, "या जगातील एकमात्र सत्य म्हणजे आपण शरीर नसून आत्मा आहोत हे जाणणे आहे. बाकी सर्व काही खोटे आहे. आत्मा कधीही मरत नाही किंवा मारला जात नाही. हे जाणण्यासाठी एकटे रहा किंवा संतांच्या सहवासात साधना कर." जेव्हा तरूण राजकुमाराने हे वाचले, तेव्हा त्यानेही लगेच आपल्या राज्याचा त्याग केला आणि तो देखील संन्याशी झाला.

## दोन पक्षांची कथा

संपूर्ण वेदांताचे तत्वज्ञान या कथेत दडलेले आहे. सोनेरी पिसारा असलेले दोन पक्षी एकाच झाडावर बसलेले असतात. एक वरच्या फांदीवर अन एक खालच्या. वरच्या फांदीवर बसलेला पक्षी, एकदम शांत, संयमी, प्रसन्न अन त्याच्या स्वत:च्याच तंद्रीत रममाण झालेला असतो, तर खाली बसलेला पक्षी काहीसा अस्वस्थ, बेचैन असतो. तो झाडाची फळे चाखत असतो, कधी गोड, तर कधी कडू.

एकदा तो खूपच कडू फळ खातो अन त्याचे लक्ष वरच्या फांदीवर बसलेल्या त्या भव्य पक्षाकडे जाते. तो स्तब्ध होतो. दिग्मूढ होतो, पण काही काळातच तो ते विसरतो, अन पुन्हा त्याचे फळ खाणे सुरु होते, कधी गोड तर कधी कडू.

कालांतराने, पुन्हा एकदा तो एक खूप कडू फळ खातो, पुन्हा त्याचे लक्ष त्या वरच्या फांदीवर बसलेल्या त्या पक्षाकडे जाते. पण यावेळी खालचा पक्षी थोडी उडी मारुन, त्या वरच्या फांदीवर बसलेल्या पक्षाच्या काहीसा जवळ जातो. पण तो वरचा पक्षी मात्र तसाच, शांत, संयमी अन प्रसन्न !

हे असे अनेक वेळा घडते, अन खालच्या फांदीवर बसलेला पक्षी प्रत्येकवेळी, वरच्या फांदीवर बसलेल्या पक्षाच्या अधिका अधिक जवळ जात राहतो. अन एक दिवशी तो नेमक्या त्याच जागी पोहचतो जिथे तो वरच्या फांदीवर बसलेला पक्षी असतो. अन आज हा खालच्या फांदीवरचा पक्षी देखील त्या जागेवर पोहचल्यावर एकदम शांत होतो, संयमी अन प्रसन्न होतो. कसलीच अस्वस्थता नाही की बेचैनी नाही.

अन, त्याक्षणी त्याला साक्षात्कार होतो की दोन पक्षी खरे तर कधीच नव्हते, होता फक्त तो अन तोच.

# कभी नही देखे ऐसे गुरूवर..

(भाग १)

**सौ. वंदना तेलंग, ठाणे**

काही काळापूर्वी नागपूरच्या एका स्वामीभक्तकविची स्वामींवरती काही गाणी ऐकण्यात आली होती. त्या अविट शब्द आणि सुरांची अजूनही इतक्या वर्षांनंतरही साथ सोडून दिलेली नाही, त्या गाण्यांत एक फार छान गाणे होते त्यात शब्द होते, “कभी नही देखे ऐसे गुरूवर, शिष्य उन्हींका होना...” खरेच स्वामींचे शिकवणे इतके छान कि त्याला कोणाचीच तोड असूही शकत नाही. ह्याच शीर्षकाखाली हे सदर लिहावेसे वाटले.




स्वामी समर्थांच्या चरित्रात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे बऱ्याच वेळेला स्वामी काय बोलायचे त्याचा संदर्भ नसल्याने सामान्य माणसांना त्यांच्या बोलण्यातील मर्म समजायचेच नाही आणि ती सिद्धांची भाषा गहन आहे असे म्हणून सोडून दिली जायची. स्वामी तर्क संगत बोलत नाहीत आणि काहीबाही बोलून जातात असेच लोकांना वाटायचे. घटना घडून गेल्यानंतर मात्र लोकांना ते कळायचे.

एक दिवस स्वामी चोळाप्पांच्याच घरात चोळाप्पा, त्यांची पत्नी येसू, सासूबाई राधाक्का, त्यांचा मुलगा कृष्णाप्पा आणि चंदा यांच्या समवेत बसले होते. अचानक स्वामींनी हातात एक काठी घेऊन जमिनीवर एक वर्तुळ काढले आणि सगळ्यांना विचारले कि हे वर्तुळ कोठे सुरू होते? प्रत्येकाने विचार करून आपापल्या पद्धतिने एखादा बिंदू त्या वर्तुळाच्या परिघावर दाखवला. स्वामींनी त्या सगळ्या बिंदूंवर खुणा केल्या आणि हसत हसत म्हणाले, “अरे, कळले नाही का तुम्हाला वर्तुळाची सुरूवात कोठे आहे? तुम्ही सगळ्यांनी वेगवेगळे बिंदू दाखवले आपापल्या विचारांनी. वर्तुळाची सुरूवात एवढया बिंदूंपासून कशी सुरू होणार? ती एकच असणार ना रे? तुम्ही सगळेच चुकलात. वर्तुळाची सुरूवात त्याच्या परिघापासून होतच नाही. ती त्याच्या केंद्रबिंदूपासून होते. तोच त्या वर्तुळाचा गाभा. अरे, आमचेही असेच होतेय. माझ्या वर्तनाचा आणि बोलण्याचा असाच अर्थ लावायचा तुम्ही प्रयत्न करता. प्रत्येकाला आपापल्या प्रवृत्तीप्रमाणे आणि ज्ञानानुसार त्याचा अर्थ काढायचा असतो. मला समजायला तुम्हाला मी कोठून बोलतोय हे समजणे आवश्यक आहे. माझ्या बोलण्याचे आणि वागण्याचे मर्म ज्याला समजले ना की त्याला किंवा तिला मी समजलो. मग तुमच्या लक्षात येईल मी का एखादी गोष्ट बोलतो किंवा करतो.

# आश्रम वार्ता

## १. श्रद्धेच्या लाटेतील ऑनलाईन कृष्णाष्टमी

रेकि विद्या निकेतन तर्फे या वर्षीचा कृष्णाष्टमीचा सोहळा अभिनव पद्धतीने चार दिवस ऑनलाईन साजरा केला गेला. ३० ऑगष्ट ला सुरू झालेला हा सोहळा २ सप्टेंबर रोजी समाप्त झाला. दर सायंकाळी झूम मिटींग्जवरती हा कार्यक्रम ७.१५ ते ९.१५ ह्या वेळेत साजरा केला गेला. कृष्ण-भजनांनी सुरू झालेला हा सोहळा त्यानंतरच्या श्री कृष्णावरचे आरोप आणि त्यांचे कृष्णाने केलेले खंडन, भगवद् गीता आणि रेकिची पंचतत्वे आणि त्यानंतरचे श्री कृष्णाची शिकवण व त्यावरील रेकि विद्या निकेतनच्या रेकी प्रशिक्षकांचे मनोगत असा हा भरगच्च कार्यक्रम साधकांना फारच आवडला.










## २. श्रद्धेच्या लाटेतील ऑनलाईन श्री गणेशोत्सव



गेल्या वर्षी प्रमाणेच यावर्षीहि रेकि विद्या निकेतनने ऑनलाईन श्री गणेशोत्सव साजरा केला. दिनांक १०, ११ , १२ आणि १९ सप्टेंबर २०२१ या दिवशी हा कार्यक्रम झूम मिटींग्जच्या अधिष्ठानावर साजरा केला गेला. साधकांच्या घराघरातील श्री गणेशाचे दर्शन हे ह्या कार्यक्रमाचे खास आकर्षण. त्यानंतर आपल्याच डि.एस. पी.पी.एल. च्या शिक्षकांनी म्हटलेले श्री गणेश अथर्वशीर्ष, गणपतिच्या आरत्या, श्री गणेशाचे आठ अवतार यावरचे श्री विवेक पांडेंचे व्याख्यान, गुरुजींनी साधकांना श्री गणेश या विषयावर विचारलेल्या प्रश्नांना दिलेली उत्तरे, श्री गणेशोत्सवामध्ये झालेले कालानुरूप बदल या विषयावर आपल्याच परिवारातील ज्येष्ठ साधकांनी केलेले प्रबोधन, आपल्याच छोटया साधकांनी गणपतिवर सादर केलेल्या नाटुकल्या अश्या विविध कार्यक्रमांनी ह्यावेळेचा गणेशोत्सव आनंदाने साजरा केला गेला.




हा संसार म्हणजे केवळ एक दंवबिंदू आहे आणि उन्हाची तिरीप आली की तो नष्ट होईल. येथे श्री स्वामी समर्थ आपणास सांगत आहेत कि आपण ज्याला संसार म्हणतो ती केवळ एक माया आहे, एक आभास आहे आणि क्षणभंगुर आहे. सत्याचा सूर्य उगवेपर्यंत ही माया, हा आभास टिकेल. परंतु ज्या क्षणी सत्याचा सूर्य आकाशात येईल त्याक्षणी ज्याला आपण खरे मानून जगत होतो, तो फक्त एका मायेचा खेळ होता हे लक्षात येईल. हेच ज्ञान आपल्याला आपल्या प्रत्येक वेदात आणि उपनिषदात सापडते. हेच ज्ञान भगवंताने अर्जुनाला भगवत गीतेत दिले आणि हेच ज्ञान अष्टावक्र मुनिंनी जनकाला सांगितले.

आपल्या आयुष्यातील सगळेच सुख–दुःखाचे अनुभव हे ह्या एका क्षणभंगुर खेळावर आधारित आहेत. आपण हे नेहमीच पाहतो कि एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी आपण तिकडचे निसर्ग सौंदर्य पाह्यला जातो आणि रात्र पडताच त्याच झाडा–झुडपांच्या जागी आपल्याला भूतांचे आभास होतात. निसर्गरम्य ठिकाण असूनही रात्रीच्या काळामध्ये आपल्याला तेच रमणीय डोंगर आणि तीच सुंदर झाडे घाबरवतात. रात्र कधी सरते असे होते. आणि पहाटेच्या पहिल्या सुर्य–किरणांनी परिसर उजळून जातो त्यावेळेला आपण त्या भीतिमधून बाहेर येऊन पुन्हा एकदा निसर्गाच्या रमणियतेचे पोवाडे गाऊ लागतो. हा त्या सत्याच्या सूर्याचा विजय आहे. म्हणूनच इशावास्य उपनिषदासारख्या प्रख्यात ग्रंथाने सुद्धा त्या सूर्याला देवता मानून त्याचे गुणगान गाईले.

स्वामी येथे कदाचित सुचवू पाहत आहेत कि संसारामध्ये किती रमायचे ह्याचेही प्रत्येकाला भान हवे. संसार करताना सुद्धा हा संसार क्षणभंगुर आहे आणि त्यात नित्य असे काहीच नाही हे जाणून प्रत्येकाने संसारात आपापली भूमिका करावी. त्यात खूप गुंतुन जाऊ नये. आणि एखादी गोष्ट आयुष्यातून गेली म्हणून शोक करत बसायचे नाही. सगळेच नश्वर असताना गुंतायचे कशात आणि कशासाठी? बालकविंचे जन पळभर म्हणतील हाय हाय.. हे वाक्यच जीवनाचे सत्व सांगून जाते.

# आगामी उपक्रम: रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| २ व ३ ऑक्टोबर | अजित सर | मुंबई (दक्षिण) | १ ली | शारदा गुरव (९८१९२१५६५०) |
| २ व ३ ऑक्टोबर | विशाल श्रीधनकर | नाशिक | १ ली | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |
| २ व ३ ऑक्टोबर | कल्पिता कीर | चिपळूण | १ ली | जयंती काटदरे (९४०५८४९३६४) |
| २ व ३ ऑक्टोबर | अरूणा | बंगळूर | १ ली | कोमल पुकाळे (९८४५२७९८४०) |
| २३ व २४ ऑक्टोबर | भारतीबेन | अहमदाबाद | १ ली | किनल पंड्या (९७१४५१५८३९) |
| २३ व २४ ऑक्टोबर | सीमाबेन | राजकोट | १ ली | ज्योति सरैय्या (९८२४२९९१५३) |
| २३ व २४ ऑक्टोबर | राकेश कुमार | मुंबई (उत्तर) | १ ली | अर्चना पाटील (९८२०३७०४६९) |
| २३ व २४ ऑक्टोबर | संगिता कुलकर्णी | बडोदा | १ ली | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |
| २३ व २४ ऑक्टोबर | अरूणा | हैद्राबाद | १ ली | रामलिंगम् (९९११५५५९७४)<br>माधवी सप्तर्षी (९८२४५८०९१९) |